Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)

**RESEARCH HUB**

**International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal**

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# ग्रंथालयांचे बदलते स्वरूप व राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील भूमिका

**प्रा. विशाल आर. गजभिये**

ग्रंथपाल

स्व. निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान

महाविद्यालय मुरमाडी/तुपकर ता. लाखनी

मोबाईल क्रमांक – 9764089449

Crossref DOI -

---

**सार :**

*पारंपारिक ग्रंथालय ते डिजिटल ग्रंथालय अशाप्रकारे ग्रंथालयांचे स्वरूप पूर्णपणे बदलत चालले आहे. पुस्तकांचा संग्रह करणे, जतन करणे, संरक्षण करणे, डिजिटलीकरण करणे इत्यादी प्रक्रिया निरंतरपणे ग्रंथालयात सुरु असतात. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 मध्ये भारतीय ज्ञान प्रणालीवर अत्याधिक भर दिलेला आहे. भारत देशामध्ये फार पूर्वीपासूनच पाठांतर म्हणजे तोंडपाठ अभ्यास करण्यात येई. अभ्यासासाठी विद्यार्थ्यांना गुरुघरी अध्ययन करायला जावे लागत असे, त्यालाच 'गुरुकुल' म्हटले जायचे. गुरुकुल पद्धती संपूर्ण भारतात पसरली होती. श्रावस्ती, नालंदा, तक्षशीला, गुनशीला, काशी, विक्रमशीला इत्यादी ठिकाणी ज्ञान केंद्र तसेच विद्यापीठे अस्तित्वात होती. विविध विषयांमध्ये अध्ययन व अध्यापनाचे कार्य चालत असे. अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, गणित, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, साहित्य, स्थापत्यशास्त्र, युध्दशास्त्र यांसारख्या बऱ्याच विषयात ज्ञानसाठा उपलब्ध होता. त्या ज्ञानसाठ्याला एका ठिकाणी संग्रहित ठेवण्यासाठी ग्रंथालयांची निर्मिती करण्यात आली होती. भारतीय संसदेने नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) ला मंजूरी दिलेली आहे. भारतीय ज्ञान प्रणालीचा (IKS) प्रचार - प्रसार करणे आपण सर्वांची जबाबदारी आहे. माहितीच्या युगात प्रचंड ज्ञानसाठ्याचा संग्रह तसेच सरंक्षण करण्यासाठी ग्रंथालय व माहिती केंद्रांची फार आवश्यकता असते. प्रस्तुत शोध निबंधात ग्रंथालयांचे बदलते स्वरूप व राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील भूमिका याबाबत माहिती समाविष्ट करण्यात आलेली आहे.*

**कळ शब्द :** ग्रंथालयांचे बदलते स्वरूप, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे ऐतिहासिक महत्व, भारतीय ज्ञान परंपरा (IKS), स्थानिक बोलीभाषा. कौशल्याधारित शिक्षण.

---

**प्रस्तावना :**

आपल्या भारत देशाला प्राचीन काळापासून ज्ञान परंपरा लाभली आहे. विद्यार्थ्यांना अध्ययन करण्यासाठी शिक्षक घरी अर्थात 'गुरुकुलात' जावे लागे. माहितीचा प्रचंड वापर, इंटरनेटचे जाळे तसेच

जागतिकीकरणामुळे पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीचा अवलंब केल्यामुळे, आणि झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था, माहिती व तंत्रज्ञानाच्या विकासाने तसेच आजच्या नवीन पिढीने आधुनिक जीवनशैलीचा स्वीकार केल्यामुळे पारंपारिक भारतीय ज्ञानाचा ऱ्हास होत होता. वरील सर्व घटकांचा विचार भारत सरकारने केल्यामुळे पारंपारिक भारतीय ज्ञानाला अधिक सक्षम करण्याची मोहीम हाती घेतल्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार भारतीय ज्ञान परंपरेला महत्व मिळाले आहे.

भारतीय ज्ञान प्रणालीचा (IKS) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये समावेश केल्याने, ग्रंथालय व माहिती केंद्रांना पारंपारिक ज्ञानासोबत आधुनिक ज्ञान विकसित केल्या जात आहे. ग्रंथालयांची निर्मिती दुर्मीळ हस्तलिखितांचे संग्रह, डिजिटल ग्रंथालयांची वाढती संख्या, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर दिला जात आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) :**

भारतीय संसदेच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने 29 जुलै 2020 रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली. स्थानिक भाषेतील अध्ययन व अध्यापनावर विशेष भर तसेच उच्च शिक्षणामध्ये बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) लवचिकता आणणारे ऐतिहासिक धोरण ठरले आहे. नव्या धोरणाने 1986 मध्ये आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची जागा घेतली. या धोरणानुसार शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण या दोन्ही स्तरांवर व्यापक सुधारणा सुचवण्यात आलेल्या आहेत. शिक्षण प्रणाली अधिक समावेशक, लवचिक, बहुविषयक आणि 21 व्या शतकाच्या गरजांशी सुसंगत करण्याचा उद्देश समाविष्ठ आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने हे स्पष्ट केलेले आहे की, कोणत्याही विद्यार्थ्याला विशिष्ट भाषा शिकण्यास भाग पाडले जाणार नाही. इंग्रजीचे माध्यम सक्तीने प्रादेशिक भाषेत बदलले जाणार नाही. NEP मधील भाषा धोरण हे केवळ मार्गदर्शक आहे. भारतात शिक्षण हा समवर्ती यादीतील विषय असल्यामुळे अंतिम निर्णय राज्ये व शैक्षणिक संस्था घेऊ शकतील याची व्यवस्था नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये घेण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे ऐतिहासिक महत्व :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे ISRO चे माजी प्रमुख डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील 9 सदस्यीय समितीने तयार केले आहे. या धोरणाचा मसुदा तयार करतांना शैक्षणिक संशोधकांचे मत विचारात घेतले गेले. या धोरणाचा मुख्य उद्देश सर्वांना शिक्षण, शिक्षणाची समान संधी आणि आवाक्यातील शिक्षणाचे उत्तरदायित्व निश्चित करणे आहे.

आतापर्यंत तीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे आलेली आहेत :

1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968
2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 आणि
3) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020.

1986 चे धोरण जवळपास 34 वर्षे लागू होते. त्यानंतर बदलाची गरज भासू लागली. शिक्षण क्षेत्राला आधुनिक आणि जागतिक दर्जाचे बनविण्याच्या दृष्टीने आखले गेले आहे. 29 जुलै 2020 रोजी अंतिम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. अकॅडेमिक बँक क्रेडीट (ABC) विद्यार्थ्यांचे शिक्षण 'क्रेडीट' स्वरूपात गुणपत्रिकेवर नोंदविले जाईल व वापरता येईल.

**शालेय शिक्षण :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्राला चालना देऊन, शिक्षणात सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करून आणि लवचिक, अभ्यासक्रमाला प्रोत्साहन देऊन शालेय शिक्षणात परिवर्तन करण्यावर लक्ष केंद्रित करते.

**उच्च शिक्षण :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे उद्दिष्ट बहु-विद्याशाखीय शिक्षणाला चालना देऊन, क्रेडिट-आधारित प्रणाली सादर करून आणि संशोधन आणि नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान (NRF) स्थापन करून उच्च शिक्षणात परिवर्तन घडवून आणण्याचे आहे.

**राष्ट्रीय शिक्षण प्रणाली (NEP 2020) मधील भूमिका :**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे आणि वेगाने बदलणाऱ्या जगात यशस्वी होण्यासाठी त्यांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान प्रदान करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची चौकट सर्वांसाठी प्रवेशयोग्य आणि न्याय्य शिक्षणासाठी सर्वांगीण, लवचिक आणि तंत्रज्ञान-सक्षम दृष्टिकोनाला चालना देऊन भारतातील शिक्षणामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी तयार करण्यात आली आहे. शिक्षणातील गुणवत्ता, उत्तरदायित्व आणि संशोधनाच्या महत्त्वावर तसेच सर्व विद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेच्या शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शिक्षक व्यावसायिक विकासामध्ये गुंतवणूक करण्याची आवश्यकता यावर जोर देते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एक लवचिक अभ्यासक्रम प्रदान करते जे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि अभिरुचीनुसार अभ्यासक्रम निवडण्याची परवानगी दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल.

**भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge System - IKS) :**

भारतामध्ये प्राचीन काळात आयुर्वेद, योग, ज्योतिष, गणित, विज्ञान, कृषी, स्थापत्यशास्त्र, धातूशास्त्र, खगोलशास्त्राचाही सखोल अभ्यास केला जात होता. शेकडो वर्षांच्या पाश्चात्य आक्रमणामुळे पाश्चात्य शिक्षणाचा आणि परंपरेचा प्रभाव आपल्या मनावर राहिला आहे, त्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरेपासून आपण दूर गेलो होतो आजच्या तरुणांना भारतीय संस्कृतीचे वैभव खऱ्या अर्थाने कळण्यासाठी भारतीय ज्ञान परंपरा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे असल्याचे दिसत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरेचे प्रत्यक्षात अनुकरण करता येईल.

Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)
**RESEARCH HUB**
**International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal**
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

**ग्रंथालयांचे बदलते स्वरूप :**

छापील पुस्तकांअगोदर ग्रंथालयात विविध माध्यमात ज्ञान साठविले जात असे त्यामध्ये मातींच्या विटांवर तसेच शिलालेख यावर कोरून लिहिले जायचे. शिलालेख, ताम्रपत्र, ताडपत्र, पपायरस, चामडा, कापडावर लिहिण्यात येत असे. तसेच महत्वपूर्ण म्हणजे कागदावर छपाई करून पुस्तकरूपाने सांभाळून ठेवणे सोयीस्कर ठरले. व आजच्या आधुनिक युगात संगणकावर प्रचंड प्रमाणात माहिती साठविली जाते. ग्रंथपालांची भूमिका केवळ पुस्तक देण्यापुरती न राहता विद्यार्थ्यांना संशोधन सहाय्य, माहिती साक्षरता आणि तांत्रिक व्यवस्थापन शिकवण्याची झाली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांमधील दर्जेदार वाचन साहित्य आणि डिजिटल सामग्री विकसित करण्यावर भर दिला गेला आहे. ग्रंथालये आता केवळ छापील पुस्तकांपुरता मर्यादित न राहता ई-बुक्स, ऑनलाईन जर्नल्स आणि पेपरलेस डिजिटल माध्यमांकडे वळत आहेत. वाचन संस्कृती रुजवणे आणि बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) अध्ययनाला प्रोत्साहन देणे हा ग्रंथालयांचा मुख्य उद्देश आहे. ग्रंथालय म्हणजे सर्व प्रकारची सर्वसाधारण पणे छापील तसेच हस्तलिखित माहितीसाधने एकत्रीतपणे ठेवण्याची जागा होय. ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असतो. नवीन ग्रंथालयांचे स्वरूप हे संगणकीय ही असू शकते. आंतरजालावरून माहितीचा शोध शक्य होतो. शालेय स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत आणि संशोधनापर्यंत सर्व टप्प्यांवर विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी ग्रंथालय महत्त्वपूर्ण ठरतात. राष्ट्रीय ग्रंथालय सेवा चौकटीत ग्रामीण व शहरी भागातील सर्व विद्यार्थ्यांना समान व सुलभ डिजिटल प्रवेश मिळावा यासाठी आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याचे धोरणात नियोजन आहे.






**निष्कर्ष** :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP 2020 ची रचना प्रवेश, समानता, गुणवत्ता, परवडणारी क्षमता आणि जबाबदारी या मार्गदर्शक तत्त्वांभोवती आयोजित केली गेली आहे. तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन आणि संशोधन आणि नवोपक्रमाला चालना देऊन भारतातील शिक्षणामध्ये परिवर्तन घडवून आणणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे. ग्रंथालयात आलेल्या वाचकांना माहिती साक्षर करून त्यांच्यात जागरुकता वाढविण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथपाल, ग्रंथालय सहाय्यक, ग्रंथालय कर्मचारी तसेच सर्व ग्रंथालये निरंतर करीत असतात. या धोरणाचा योग्य पद्धतीने अंमल झाल्यास भारताच्या शिक्षण धोरणाला जागतिक दर्जा मिळू शकेल यात काही शंका नाही.

**संदर्भ :**


- मांडवकर, पवन. *भारतीय ज्ञान परंपरा आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण* 2025
- टेंभेकर, आशिष. *भारतीय ज्ञान परंपरा* नागपूर. पिंपळापुरे कं. पब्लिशर्स, 2024
- national-educational-policy-2020-in-marathi/
- https://dnyantarangini.com/2023/02/national-education-policy-2020-nep-2020